ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Regd. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख ११ मे, १९५५ | अंक १९

## विविध माहिती

**उच्च तांत्रिक शिक्षणाची संस्था**— उच्च तांत्रिक शिक्षण देणारी एक संस्था मुंबई येथें काढण्यांत येणार असल्याचें समजतें. संस्थेला लागणारें साहित्य आणि तंत्रज्ञांचें साह्य दोन्हीहि रशिअन सरकार द्यावयास तयार आहे. अशा प्रकारच्या चार संस्था काढण्याचा भारतीय सरकारचा विचार आहे. पैकी एक पश्चिम बंगालमध्यें ह्यापूर्वींच सुरू झाली आहे.

**आंध्र राज्यांत कोळशाचे थर**— भारतीय सरकारच्या भूस्तर खात्याला आंध्र राज्यांत कोटागुडम्‌जवळ गोदावरी नदीच्या डाव्या किनाऱ्याला लागून कोळशाचे थर सांपडले आहेत. तथापि हे थर किती रुंदीचे आहेत तें अजमावण्यासाठी गोदावरीच्या पात्रांत खोल खणण्याची शिफारस त्यांनीं केली आहे. हैद्राबाद राज्यांतील कोळशाचे थरच ह्या भागांत पसरलेले असावेत, असा अंदाज करण्यांत आला आहे.

**इस्पितळ सर्वांसाठी खुलें केलें**— नवसारी येथील दाबू पारसी जनरल हॉस्पिटल गेल्या चार महिन्यांपासून सर्व जातींच्या रोग्यांना खुलें करण्यांत आलें आहे. ह्या काळांत इस्पितळांतील सवलतींचा फायदा १,२५० बाहेरच्या रोग्यांनीं घेतला व २०० रोग्यांवर शस्त्रक्रिया करण्यांत आल्या. इस्पितळाच्या चालकांनीं आतां रक्तदानाची सोय करण्याचें ठरविलें आहे.

**इस्पितळाला देणगा**—भोपाळ येथें क्षयरोग्यांना उपचार करण्यासाठी एक नवीन इस्पितळ बांधण्यांत येणार आहे. इस्पितळ बांधण्यासाठी मुंबईचे उद्योगपति श्री. भिवंडीवाला ह्यांनीं ८०,००० रुपयांची देणगी देऊं केली आहे. इस्पितळांत २० रोग्यांची व्यवस्था करण्यांत येणार आहे. गेल्या जूनमध्यें राज्य-सरकारनें १२ लाख रुपये खर्चून नवें इस्पितळ बांधलेलें आहेच.

**गुजराती युवकांची तयारी**—गुजरात युवक कॉंग्रेसतर्फे ४०० विद्यार्थ्यांची एक तुकडी देशांतील विकास-योजनांचीं कामें पहाण्यासाठी १ मे रोजीं अहमदाबादहून खास गाडीनें निघाली. ही तुकडी सुमारें ५,००० मैलांचा प्रवास करील. ते ज्या गाडीनें प्रवास करतील, तिची साफसफाई व स्वच्छता राखण्याचें काम विद्यार्थीच करणार आहेत.

**ब्रह्मदेशाला जागतिक बँकेचें कर्ज**—ब्रह्मदेशांतील साधन-संपत्तीची आणि आर्थिक विकासाच्या कामाची पहाणी करण्यासाठी चार महिन्यांपूर्वीं जागतिक बँकेचे प्रतिनिधी त्या देशांत गेले होते. त्यांनीं केलेल्या अहवालाचा विचार करून बँकेनें ब्रह्मदेशाला कर्ज देण्याचें कबूल केलें आहे. कर्जाच्या अटी व तपशील अद्याप प्रसिद्ध झालेला नाहीं.

**नवा पोलादाचा कारखाना**—भारतांत आणखी एक पोलादाचा कारखाना काढण्यास मदत करण्यासाठी ब्रिटनमधील पोलादाच्या धंद्यांतील तज्ज्ञांचें मंडळ भारतांत आलें होतें. मंडळानें आपला दौरा पुरा केला व तें ब्रिटनला परत गेलें. पश्चिम बंगालमधील दुर्गापूर हें ठिकाण पसंत करण्यांत आलें आहे असें समजतें. तथापि अखेरचा निर्णय भारतीय सरकार घेणार आहे.

**दिल्लींत मर्यादित दारूबंदी**—दिल्ली राज्याच्या दारूबंदी-विषयक कमिटीनें तीन वर्षांच्या आंत राजधानींत मर्यादित स्वरूपाची दारूबंदी सुचविण्याचें ठरविलें आहे. परवाने देऊन भारतीय नागरिकांना दारू मिळण्याची व्यवस्था केली जाईल. परकीयांना मात्र दारूबंदी लागू होणार नाहीं. ३० वर्षांच्या आंतील हिंदी नागरिकाला परवाना देण्यांत येणार नाहीं.

**सहकाराचें शिक्षण देणारें केंद्र**—ता. १ जुलै, १९५५ पासून राजकोट येथें सहकाराचें शिक्षण देणारें केंद्र खोलण्यांत येणार आहे. ह्या केंद्रांत दोन प्रकारच्या शिक्षणक्रमानुसार शिक्षण देण्यांत येईल. पहिला क्रम १२ महिन्यांचा असून त्यांत सहकारी चळवळींचें उच्च शिक्षण देण्यांत येईल. दुसऱ्या शिक्षणक्रमांत ६ महिन्यांच्या अवधींत सहकाराचा डिप्लोमा देण्यांत येईल.

**नेपाळमध्यें नवा रस्ता**—पूर्व नेपाळमध्यें ३० मैल लांबीचा नवा मोटारीचा रस्ता बांधण्याचें काम ब्रिटनतर्फे सुरू करण्यांत आलें आहे. नेपाळमधील गुरख्यांची ब्रिटिश लष्करांत भरती करण्याचें केंद्र धरणबाजार येथें आहे. तेथून थेट नेपाळ-भारत सरहद्दीपर्यंत हा नवा रस्ता तयार करण्यांत येत आहे.

**बिहारच्या राजधानींत पाण्याचें दुर्भिक्ष**—बिहारची राजधानी रांची येथें पाण्याच्या दुर्भिक्षानें रौद्र स्वरूप धारण केलें आहे. शहरांतील व उपनगरांतील सर्व विहिरी पूर्णपणें आटून गेल्या आहेत. म्युनिसिपालिटीतर्फे करण्यांत येणारा पाण्याचा पुरवठा फारच अपुरा पडत आहे. हमाली करणारे मजूर दूरच्या ठिकाणांहून पाणी आणून तें २ ते ३ पैसे गॅलन, ह्या भावानें विकीत आहेत.

**पाकिस्तानांत अमेरिकन तज्ज्ञ**—पाकिस्तानमधील विकास-योजनांची पहाणी करून त्या अधिक कार्यक्षम करण्यासाठी काय करावें तें सुचविण्यासाठी अमेरिकन औद्योगिक तज्ज्ञांचें एक मंडळ लवकरच पाकिस्तानांत जाणार आहे. हें मंडळ पाकिस्तानांत एक वर्षभर राहील आणि अमेरिकन भांडवल पाकिस्तानांत गुंतविण्यासंबंधीं सूचना करील.


## भोर स्टेट बँकेची भोर येथील मालकीची इमारत

### भूमिपूजनाचे प्रसंगीं बँकेचे चेअरमन, श्री. म. व्यं. शिंगरे, ह्यांचें प्रास्ताविक भाषण

"बँकेच्या स्थापनेच्या बाबतींत व पुढें प्रगतीचे कामीं आपल्या संस्थानचे अधिपति कै. सर हिजहायनेस बाबासाहेब पंतसचिव यांनीं बहुमोल साहाय्य केलें व आपल्या सर्वांचे सहानुभूतिपर व आपुलकीचे भावनेमुळें, बँकेचा व्यवहार वाढत गेला. तसेंच त्या वेळीं असलेले संस्थानी अधिकारी यांनींहि उत्तम प्रकारें सहकार्य केलें. आजच्या या सुप्रसंगीं मोठ्या आनंदाची गोष्ट म्हणजे पूर्वीचे युवराज श्रीमंत हिज हायनेस भाऊसाहेब पंतसचिव यांना भोरचे अधिपति (राजा ऑफ भोर) म्हणून नुकतीच राष्ट्रपतींनीं मान्यता दिली आहे, त्याबद्दल मी आपणा सर्वांतर्फे व बँकेतर्फे त्यांचे आदरपूर्वक अभिनंदन करतों. आज श्रीमंत भाऊसाहेब पंतसचिव व राजेसाहेब ऑफ भोर प्रत्यक्ष उपस्थित राहणार होते. आम्ही त्यांना समक्ष आमंत्रणहि दिलें होतें. परंतु कांहीं महत्त्वाचे कामाकरितां परगांवीं गेल्यामुळें ते येऊं शकले नाहींत, त्यास नाईलाज आहे.

"आपल्या बँकेनें अन्नधान्याचे नियंत्रणाचे वेळीं, दरबारास रक्कम उपलब्ध करून दिली. पुढें ठेवींत उत्तरोत्तर वाढ होत गेली ती रु. १९ लाखांचेवर गेली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संस्थानें विलीन झालीं व त्यामुळें संस्थानी सरकारचा पाठिंबा गेला व त्यामुळें सरकारी ठेवी एकदम परत कराव्या लागल्या. त्यामुळें अडचणी वाढूं लागल्या. तथापि अशाहि प्रसंगीं आटोकाट प्रयत्न केल्यामुळें पुढेंपुढें पुन्हा ठेवींत वाढ होत गेली व आपल्या बँकेवरील विश्वासहि वाढत गेला. आतां बँकेकडे सुमारें १३ लाखांचेवर ठेवी आहेत. बँकेच्या भांडवलांत वाढ होत गेली व एकूण भागांचें भांडवल २½ लाख रुपये झालें. रिझर्व्ह व इतर फंड मिळून रक्कम रुपये ७६ हजारांचेवर, म्हणजे भांडवलाचे मानानें ⅓ चेवर आहे. आपल्या बँकेच्या संचालक मंडळानें संस्थानाचे हद्दींत म्हणजे शिरवळ व पाली येथें शाखा काढल्या व विलिनीकरणानंतर पुणें येथेंहि सन १९४९ मध्यें शाखा काढली. या शाखांचे द्वारें ग्रामीण विभागांत बँकिंगची आवड उत्पन्न झाली व लोकांना बचतीचीहि संवय होऊं लागली.

"रिझर्व्ह बँकेनें नेमलेल्या ग्रामीण प्रश्न—पाहणी समितीप्रमाणें आतां इंपीरिअल बँक व कांहीं मोठ्या स्टेट असोसिएटेड बँका यांचें विलिनीकरण होणार आहे. त्यामुळें मुख्यतः सुलभ अशी पैसे एका ठिकाणाहून दुसरीकडे पाठविण्याची सोय होणार आहे. येत्या पांच वर्षांत सुमारें ४०० शाखा काढण्याचें कार्य ह्या नवीन बँकेस करावयाचें आहे. या समितीचा अहवाल मुख्यतः शेतकी व्यवसाय कीं, ज्यांत उत्पादन, कच्च्या मालाचें पक्क्या मालांत रूपांतर व मालाची साठवण यासाठी लागणारी व्यवस्था व पैसा उपलब्ध करून देण्याची योजना आहे. स्टेट बँक स्थापन झाली व तिच्याकडे असलेला सर्व पैसा एकत्र केला तरी जादा पैसा कोठून येणार हा प्रश्न आहे. कारण, ज्या बँकांचें एकीकरण करणार त्यांची रक्कम व्यवहारांत गुंतलेलीच राहणार. शिवाय या नवीन बँकांनीं सर्वमान्य बँकिंग आदेशास पात्र राहूनच व्यवहार करावयाचा आहे. अशा परिस्थितींत देशांतील व्यापार व उद्योग यांना या नवीन बँकेपासून कितपत उपयोग होईल हा प्रश्न आहे. बँकिंग क्षेत्रांत लहानमोठ्या संस्थांना योग्य प्रकारचें मार्गदर्शन झाल्यास त्यांना स्वतंत्र कार्यक्षेत्र आहे, असा माझा अनुभव आहे. या दृष्टीनें लहान बँका ज्यास्त उपयुक्त करण्याचा प्रयत्न होणें जरूर आहे.




"आज आपल्या बँकेनें आपल्या स्वतःचे मालकीच्या इमारतीच्या कामास सुमुहूर्तावर सुरुवात केली आहे. इमारत सरकारी कचेऱ्या व राजवाडा यांचेजवळ आहे. इमारत खरेदी केली असून बँकेच्या उपयोगास योग्य अशी त्या इमारतीची पुनर्रचना करण्याचें ठरविलें आहे. ती इमारत आज कशी आहे व तयार झाल्यावर कशी होईल याची रूपरेषा येथेंच ठेवलेल्या ब्ल्यू प्रिंटच्या नकाशावरून दिसून येईल. त्यामध्यें बँकेच्या उपयोगासाठी, तसेंच सेफ डिपाझिट व्हॉल्ट, गोडाऊन वगैरेंची सोय आहे. सर्वच इमारत पाडून नवीन बांधण्यापेक्षा आहे या इमारतीचा जास्तींत जास्त उपयोग करून घेण्याचें संचालक मंडळानें ठरविलें आहे व त्यासाठी सुमारें रु. १५,००० ते २०,००० पर्यंत खर्च करण्याचा संचालक मंडळाचा विचार आहे."

## इमारतींसाठी रंगीत पोलादाचा उपयोग

अल्युमिनियम कंपनी ऑफ अमेरिका ही कंपनी अमेरिकेंत बांधल्या जाणाऱ्या गगनचुंबी इमारतींसाठी रंगीत अल्युमिनियमच्या पत्र्यांचा उपयोग करूं लागणार आहे. ही कंपनी पिट्सबर्ग येथें पेन्सिल्व्हिआ स्टेट ऑफिससाठी एक इमारत बांधणार आहे. ह्या इमारतींत १९ मजले असतील आणि ती बांधतांना निळ्या रंगाच्या अल्युमिनियमच्या पत्र्यांचा उपयोग करण्यांत येईल. ही इमारत तयार झाल्यावर अमेरिकेंतील उंच उंच इमारतींच्या बांधकामांत रंगीत अल्युमिनियमचा अधिकाधिक उपयोग केला जाईल, असा कंपनीच्या चालकांचा विश्वास आहे. गेल्या वर्षी ह्या कंपनीनें सिनसिनॅटी ह्या शहरांत आपल्यासाठी नवी विक्री-कचेरी बांधली. त्यावेळीं तिनें प्रथमच रंगीत अल्युमिनियमचा उपयोग करून पाहिला. कंपनीच्या इमारतीसाठी निळ्या, सोनेरी व सोनेरी रंगाच्या पत्र्यांचा उपयोग करण्यांत आला. कंपनीच्या म्हणण्याप्रमाणें अशा प्रकारच्या पत्र्यांचा उपयोग चर्चेस, शाळा अगर घरें बांधण्याच्या कामीं चांगला होऊं शकेल. सध्या अमेरिकेंत उंच हवेल्या बांधण्याच्या कामीं रुपेरी रंगाचे अल्युमिनियमचे पत्रे मोठ्या प्रमाणावर वापरले जात आहेतच. असे पत्रे वापरल्यामुळें मजुरींत बचत होते. बचत कशी होते तें दाखविण्यासाठी गेल्या वर्षी न्यूयॉर्क येथें एका उंच हवेलीचा लोखंडी तुळयांचा व खांबांचा सांगाडा प्रथम उभारण्यांत आला आणि मग बाहेरच्या बाजूनें त्यावर अल्युमिनियमचे पत्रे ठोकण्यांत आले. पत्रे ठोकण्यास अवघे ९॥ तास लागले.

# अर्थ

बुधवार, ता. ११ मे, १९५५



संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## मुंबई राज्यांतील शेतकी कर्जांची गरज भागविण्याची योजना

### मुंबई स्टेट बँकेचा आढावा

मुंबई राज्य सहकारी बँकेचा तपशीलवार वार्षिक वृत्तांत दरवर्षी प्रसिद्ध होत असतो, त्यांत बँकेच्या कामाचा काळजीपूर्वक आढावा घेण्यांत येतो. सरकारची मदत, रिझर्व्ह बँकेकडून मिळालेलीं कर्जे, भाग भांडवल व सभासद, बँकिंगचे व्यवहार, बँकेचें कार्यक्षेत्र, शेतकी कर्ज-पुरवठ्याची व्यवस्था, सहकारी संस्थांना कर्जे, व्यक्तींना कर्जे, बँकेच्या कर्जाचा एकूण व्यवहार, कारभार, इत्यादि विभागांत सुमारें ७५ पृष्ठांमध्यें आढावा घेणारा १९५३–५४ चा वृत्तांत आमचेकडे आला आहे. प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांची आर्थिक तज्ज्ञ म्हणून बँकेच्या बोर्डावर मुंबई सरकारनें नेमणूक केलेली आहे आणि बँकेचें धोरण आंखण्यांत व तें अंमलांत आणण्यांत त्यांच्या नेतृत्वाचा बराच मोठा भाग आहे. श्री. वैकुंठराय मेहतांच्या मार्गदर्शनाचाहि लाभ बँकेस मिळतो; त्यांच्या इतका सहकारी चळवळीचा निष्ठावंत तज्ज्ञ सेवक विरळा! अशा बँकेच्या आढाव्यांतील शेतकी कर्ज-पुरवठा व्यवस्थेबाबत अनुभव व्यापक महत्त्वाचा वाटेल.

### वार्षिक कर्जमर्यादा पद्धति अजून चालू

पतवाल्या शेतकऱ्यांना शेतकी व विक्री ह्यांसाठी भांडवल-पुरवठ्याची संघटित व्यवस्था मुंबई राज्यांत आतां चार-पांच वर्षें अंमलांत आहे. सावकारीवर नियंत्रण, जुन्या कर्जांची तडजोड, इत्यादींमुळें शेतकऱ्यांना कर्ज मिळणें कठीण होऊं लागलें व खाजगी कर्ज-पुरवठ्याची जागा भरून काढण्यासाठी संघटनेची तांतडीची गरज निर्माण झाली. मुंबई राज्यांत सहकारी संस्था त्या कामीं उत्कृष्टपणें उपयोगी पडतील असें ठरलें. आवश्यक त्या पुनर्घटनेनंतर व सरकारी साह्यानें, सहकारी संस्थांचा उपयोग अल्प व मध्यम मुदतींचीं शेतकीसाठी कर्जें देण्याकडे, त्याचप्रमाणें पिकें काढण्यासाठी, मालाची विक्री करण्यासाठी व शेतसुधारणेसाठी कर्जें देण्याकडे करतां येईल, अशी अपेक्षा होती. ही योजना कार्यक्षमतेनें अंमलांत येऊं शकली नाहीं, ह्याचें कारण तिचें खरें स्वरूप सहकारी कार्यकर्त्यांना नीट समजलेंच नाहीं आणि कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना तर तिचें रहस्य उमगलेंच नाहीं. कर्जपुरवठा, शेतीचें उत्पादन आणि त्याची विक्री ह्यांची साखळी नीट जुळवली गेली नाहीं. माल–विक्रीच्या सोईस्कर संस्था अस्तित्वांत नव्हत्या; कर्जदारांतहि त्या बाबतींत हितकारक जागरूकपणा नव्हता. कित्येक खरेदी–विक्री संस्थांचा कारभार गैरशिस्त होता, त्यामुळें शेतकऱ्यांचा त्यांवरील विश्वास उडाला. कित्येक ठिकाणच्या दुष्काळामुळें पतवान शेतकऱ्यांना दिलेलीं कर्जें वसूल होऊं शकलीं नाहींत, इतकेंच नव्हे तर पुढील वर्षाच्या पिकांसाठी जादा कर्ज द्यावें लागलें. ह्या सर्व कारणांमुळें वार्षिक कर्जमर्यादा मंजूर करण्याची जुनी पद्धतच बऱ्याच अंशीं अद्याप अंमलांत राहिली आहे.

### मार्गांतील अडचणी

शेतकी कर्ज-पुरवठ्यावर उपाय-योजना करण्याचे प्रयत्न सतत चालूच आहेत. त्यासंबंधांतील उद्दिष्टें व धोरणें आणि प्रत्यक्ष परिस्थिति, ह्यांतील फरक लक्षांत घेतला, म्हणजे उपाय-योजना यशस्वी होण्याच्या मार्गांतील अडचणी मोठ्या वाटूं लागतात. जुन्या पद्धतीची जागा नव्या पद्धतीनें घ्यावयाची त्याच्या पूर्वतयारीची सर्वांना कल्पना आहे; पण ती तयारी पुरी होण्याचे आधीं फार पुढच्या ध्येयावर भर दिला गेला व अपेक्षा निर्माण केल्या तर तें इष्ट ठरेलच असें नाहीं. ॲग्रिकल्चर फॉरेस्ट्री आणि फिशरीजच्या पॉलिसी कमिटीच्या ॲग्रिकल्चरल फिनॅन्स सब्–कमिटीचे प्रा. गाडगीळ हे अध्यक्ष होते. त्या कमिटीचें मत अहवालांत उद्धृत करण्यांत आलें आहे. त्याचप्रमाणें, कम्युनिटी प्रॉजेक्टसच्या प्रोग्रॅम इव्हॅल्युएशन संघटनेचे डायरेक्टर, प्रा. कर्वे, ह्यांचाहि इशारा उद्धृत केलेला आहे. बर्कले येथील शेतकी कर्जपुरवठ्याबाबत आंतरराष्ट्रीय परिषदेचा अभिप्रायहि देण्यांत आला आहे. त्याचप्रमाणें, फोर्ड फाउंडेशनचे सल्लागार, मि. चेस्टर सी. डेव्हिस, ह्यांचाहि अभिप्राय नमूद करण्यांत आला आहे. रूरल बँकिंग चौकशी कमिटीचा अहवाल व गोरवाला कमिटीचा अहवाल, हें ह्याविषयावरील सर्वांत ताजें व महत्त्वाचें वाङ्मय आहे; आणि ह्या सर्व गोष्टींचा उल्लेख करण्याचा हेतु शेतकी कर्जपुरवठ्याच्या प्रश्नाची गुंतागुंत, त्याच्या अडचणी व त्यासंबंधांतील मर्यादित वाव, ह्यांची जाणीव करून देणें हाच आहे. बँकेच्या गेल्या वर्षीच्या अहवालांतहि ह्याच धोरणानें आंकडेवार माहिती व अडचणी ह्यांचा तपशीलवार उल्लेख केलेला होता. कमिट्यांनीं सल्ला देऊन मोकळें होणें व जनतेच्या ठेवींवर चालणाऱ्या संस्थांनीं तो अंमलांत आणणें, ह्यांतील फरक ध्यानांत धरूनच ह्या सर्व प्रश्नांकडे पाहिले पाहिजे.

### ९० टक्के गरज भागलेली नाहीं

मुंबई राज्यांत ३४,६०० खेडीं असून १६,६०० शेतकी पतपेढ्या व विविध कार्यकारी सोसायट्या आहेत. सभासद–संख्या सुमारें ८·८७ लक्ष आहे. दर सभासदामागें १२६ रुपये, अशी कर्जाची सरासरी पडते. ऊंस, कपास, तंबाखू, बटाटे, इत्यादि पिकांना येणारा भारी उत्पादन-खर्च लक्षांत घेतला, तर ही सरासरी रक्कम फारच अल्प वाटेल. बिगर पतवाल्या किंवा कमी पतवाल्या शेतकऱ्यांना आणि खंडकऱ्यांना कर्ज देण्याचा प्रश्न अद्याप सुटलेला नाहीं; आर्थिक-दृष्ट्या मागासलेले प्रदेश व लोक सहकारी संघटनेंत येऊं शकलेले नाहींत. मुंबई राज्यांतील शेतकीच्या कर्ज-विषयक गरजांचा अंदाज गेल्या वर्षीं करण्यांत आला होता. त्यांत असें आढळलें कीं, दर मोसमांत १०८ कोटी रुपयांची आवश्यकता आहे. आज त्यांपैकी फक्त १२ कोटी रुपयांची गरज सहकारी संस्थांमार्फत भागविली जात आहे, ह्यावरून अद्याप किती पल्ला गांठावयाचा आहे, ह्याची कल्पना येईल.

## शेतकी कर्ज-पुरवठ्याची प्रगति

(लक्ष रुपयांचे आंकडे)

| | १९४६ | १९५१ | १९५३ | १९५४ |
|---|---|---|---|---|
| **शेतकी सोसायट्या** | | | | |
| सोसायट्यांची संख्या ... | ४,७९६ | ९,४२९ | १०,०८० | १०,५९१ |
| सभासद (लक्ष) ... | २·३२ | ६·९९ | ८·२० | ८·८७ |
| वसूल भांडवल ... | ५१·४४ | २२६·४४ | ३२३·७१ | ३८०·८९ |
| रिझर्व्ह व इतर फंड ... | १११·९५ | २१६·०५ | १८२·६६ | १९५·४१ |
| सभासदांच्या ठेवी ... | १७·५६ | १४१·१७ | ७६·७१ | ७७·६५ |
| खेळतें भांडवल ... | ३०६·८२ | १०६९·३५ | १४४३·२१ | १५४६·६० |
| सभासदांकडून येणें कर्जें ... | २१२·४३ | ७१९·९४ | ११२६·२२ | १२२१·६५ |
| प्रत्येक सभासदामागें किती कर्जें (सरासरी) ... | ९१ | १२४ | १४८ | १२६ |
| प्रत्येक सोसायटींत किती सभासद (सरासरी) ... | ४८ | ७३ | ८१ | ८३ |
| **मध्यवर्ती बँका व मुंबई स्टेट को. बँक** | | | | |
| मध्यवर्ती बँका व स्टेट को. बँक ... | १३ | २५ | २५ | २५ |
| त्यांच्या कचेऱ्या ... | १४० | २३१ | २५४ | २७२ |
| संलग्न सोसायट्या ... | ६२७८ | १२,९५४ | १४,७६३ | १५,४४३ |
| वसूल भांडवल ... | ५६·५४ | १४०·२३ | १६९·३५ | १८२·१४ |
| रिझर्व्ह व इतर फंड ... | ६२·७० | १११·२६ | १४८·४७ | १५७·५० |
| ठेवी ... | ११७८·८५ | १९१९·४८ | २१२४·१८ | २२६३·४० |
| सोसायट्यांकडून येणें कर्ज ... | १९६·९ | ९५८·६९ | १०१९·३६ | १०८३·३७ |
| खेळतें भांडवल ... | १४०८·१३ | २५५२·८३ | २७६६·३७ | २९८९·१९ |

## मुंबई राज्यांतील शेतकी (पीक) कर्जाची गरज

| पिकें | सोसायटी देत असलेलें दर एकरीं कर्ज (रु.) | एकूण (रु.) |
|---|---|---|
| इतर खाद्यधान्यें | २५ | १३,१६,०७,५०० |
| ज्वारी-बाजरी | २० | ४१,०४,९४,००० |
| डाळी | १५ | ६,४७,४४,५०० |
| ऊंस | ५०० | ९,१८,००,००० |
| फळभाज्या | ३०० | ९,४३,२०,००० |
| बटाटा | ४०० | ८६,४०,००० |
| इतर खाद्यपिकें | २० | ४६,१६,००० |
| भुइमूग | ४० | ९,५४,८८,००० |
| इतर गळिताचीं धान्यें | २० | २,४६,९४,००० |
| कपास | ४० | ९,९६,३६,००० |
| तंबाखू | ५० | १,१९,२०,००० |
| वैरण चारा | १० | ४,२५,६२,००० |
| एकूण | | रु. १,०८,०५,३२,००० |

(सोसायटी देत असलेल्या कर्जाच्या दर एकरीं सरासरी रकमेच्या हिशेबानें वरील १०८ कोटी रुपयांच्या गरजेचा हिशेब केलेला आहे.)

**इराकचें कला-प्रदर्शन**—हैदराबादच्या राजप्रमुखांनीं इराकी कलेच्या प्रदर्शनाचें हैदराबाद येथें उद्घाटन केलें. कलाप्रदर्शनांत इराकमधील १०९ तैलचित्रें, १३ शिल्पाचे नमुने आणि ५० छायाचित्रें आहेत. प्रदर्शन भरविण्याची कल्पना हैदराबाद आर्ट सोसायटी आणि ऑल इंडिआ फाइन आर्टस् अँड क्रॅफ्टस् सोसायटीच्या स्थानिक कमिटीनें पुरस्कृत केली होती.

## काथ्याच्या वस्तूंच्या सहकारी संस्था

त्रावणकोर-कोचीन राज्य-सरकारनें काथ्याच्या उद्योगधंद्याचा विकास करण्यासाठी मोठी रक्कम खर्च केली आहे. मार्च, १९५५ अखेर राज्यांतील काथ्याच्या वस्तू तयार करणाऱ्या सहकारी संस्थांना कर्जें व मदत ह्यांच्या रूपानें १८,७८,००० रुपये देण्यांत आले आहेत. ८८ सहकारी संस्थांना मिळून आतापर्यंत १५,७२,५०० रुपयांचीं कर्जें देण्यांत आलीं आहेत आणि ८७ सहकारी संस्थांना मिळून ३,०५,५०० रुपये मदतीदाखल देण्यांत आले आहेत. ३१ मार्च, १९५५ अखेर ज्या सहकारी संस्था काम करीत होत्या अशांतील सभासदांची एकूण संख्या २१,०१७ इतकी होती. विकल्या गेलेल्या भागांची संख्या ७५,४३२ इतकी होती. हे सर्व भाग मिळून ३,१५,४३२ रुपयांचें भांडवल गोळा झालेलें आहे. सहकारी संस्थांतर्फे होणाऱ्या व्यापारी उलाढालींतहि चांगली वाढ झालेली आहे. सर्व संस्थांच्या मिळून व्यापारी उलाढालीची रक्कम १,५८,००,००० रुपयांच्यावर गेली आहे. ह्या संस्थांतील सभासदांचें आर्थिक-सामाजिक स्थानहि बोधप्रद आहे. एकूण सभासदांच्या संख्येपैकी जवळ-जवळ ६० टक्के सभासद मजूर वर्गांतील आहेत. उरलेले सभासद छोटे उद्योग-व्यवसाय करणाऱ्या व्यापारी वर्गांतील आहेत. ज्या ज्या सहकारी संस्थांना सरकारी कर्ज अगर इतर प्रकारची आर्थिक मदत मिळण्याचा कायदेशीर हक्क होता व ज्यांनीं अशा मदतीसाठीं अर्ज केलेले होते, अशा सर्वांना मदत देण्यांत आली आहे.

**अणुविषयक संशोधनास मदत**—चीन आणि पूर्व-युरोपांतील राष्ट्रें ह्यांच्या अणुसंशोधनविषयक कार्यास मदत करण्याची तयारी रशिआनें दाखविली आहे. ह्या कामासाठीं लागणारी शास्त्रीय सामुग्री आणि तज्ज्ञ शास्त्रज्ञांचा सल्लाहि रशिआनें देऊं केला आहे.

## समाज विकास योजनांसंबंधीं मूल्यमापन संघटनेचा अहवाल

समाजांतील खालच्या थरापासून वरपर्यंत लोकशाहीची उभारणी करण्याचा अपूर्व असा आशादायी दृष्टिकोन समाज विकास योजना कार्यान्वित झाल्या तेव्हांच आपणांस प्राप्त झाला. केवळ सांगितलेल्या गोष्टी औपचारिकपणें पुऱ्या करण्याच्या सोप्या मार्गानें वाहवत न जातां आणि जनतेस या कार्यक्रमांत भाग घेण्यास उद्युक्त करून आपण याच पद्धतीची कांस धरली तर लोकशाहीच्या प्रगतीसाठीं कायमची सेवा बजाविल्यासारखें होईल. समाज विकास योजनांचें यश जनतेच्या नेतृत्वावर अवलंबून असून, दुसऱ्या कोणत्याहि मार्गानें तें नेतृत्व तयार होणार नाहीं.

जनतेचा सामूहिक आत्मविश्वास विधायक मार्गांनीं वळविण्याचें कार्य समाज विकास योजनांनीं केलें आहे. शिक्षण असो, आरोग्याचे प्रश्न असोत, शेतीची लागवड करण्याची बाब असो किंवा राहाणीचें चांगलें मान संपादन करण्याचें ज्ञान व साधनें यांचा प्रश्न असो, या सर्व गोष्टी समाज विकास योजनांमुळें लोकांच्या आवाक्यांत आल्या.

खात्या-खात्यांतील सुसूत्रतेचा प्रश्न सुटला आहे असें समजणें चुकीचें होईल. विशेषतः विकास किंवा विस्तार गट हा या कार्यक्रमांतील परिणामकारक भाग असून त्यांच्याच बाबतींत अद्यापि बरीच अनिश्चितता आणि सुसूत्रतेचा अभाव आढळून येतो. विकास कार्यक्रमांचें स्वरूप जनतेच्या आवडीचें असावें आणि अधिकाऱ्यांनीं त्यांमध्यें भाग घ्यावा; ठराविक साच्यांचा अधिकाऱ्यांनीं आंखलेला कार्यक्रम आणि त्यांत भाग घेण्यासाठीं जनतेला आवाहन, असें कार्यक्रमाचें स्वरूप नसावें.

कलेक्टरच्या हाताखालील महसूल व विकास कार्यासाठीं असलेल्या नोकरवर्गांत कामाची विभागणी करण्यांत यावी. केवळ प्रत्यक्ष ठरविलेल्या गोष्टींची संख्या पूर्ण करण्यावर खालच्या पातळीवर देण्यांत येणारा अवास्तव भर, विकास गटांच्या संख्येंत झपाट्यानें करण्यांत येणारी वाढ आणि कलेक्टर म्हणजे विकास कार्यास जुंपलेल्या महसूल व न्यायविषयक नोकरवर्गाचा कप्तान नसून प्रमुख विकास व कल्याणकारी अधिकारी आहे या त्याच्या नव्या भूमिकेबद्दल अद्यापीहि अधिकाऱ्यांच्या ठायीं असलेला गैरसमज, या सर्व गोष्टींमुळें समाज विकास योजनांची निकोप प्रगति होण्यास खीळ बसली आहे आणि ग्रामीण विकास कार्यक्रमास लोकशाही स्वरूप मिळण्यास अटकाव झाला आहे.

विकास कार्याचीं धोरणें आणि योजना यांत सर्व पातळींवर सुसूत्रता साधण्याची जरूरी लक्षांत घेत असतांना अनेक खात्यांचीं नेहमींचीं कामें त्यांच्या यंत्रणेमार्फत आणि नोकरवर्गातर्फेच करून घेण्यास प्रोत्साहन दिलें पाहिजे. ब्लॉक डेव्हलपमेंट ऑफिसराच्या पदावर शेतकी अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याची सूचना योग्य आहे. त्या उलट, ब्लॉक डेव्हलपमेंट ऑफिसरच्या जागीं महसूल खात्यांतील नोकरांना नेमण्याची पद्धति कमी करावी व महसूल खात्यांतील अधिकाऱ्यांना त्यांच्या नेहमीच्या इतर कामाबरोबरच याहि जागेचें काम सांगण्याची पद्धति तर अजिबात बंद करण्यांत यावी; कारण या गोष्टी अगदीं अयोग्य आहेत.

समाज विकास योजना व राष्ट्रीय शेती विस्ताराचे कार्यक्रम यांची तातडतोबीनें वाढ करण्याची गति थोडी अधिक दक्षतेनें नियमित करण्याची इष्टता आहे. संघटनात्मक कामांची पूर्तता व अधिकारानुसार जबाबदारी आणि समाज विकास योजना कारभार मंडळाकडून वेळोवेळीं सांगण्यांत आलेल्या कार्यक्रमाची अंमलबजावणी, अहवालाचे तक्ते भरणें हीं कामें अगदीं जुजबी पद्धतीनें पुरीं करणें, इत्यादी कामांवर भलताच भर देण्यांत येऊं नये. विशेषतः दर्जावरच भर देण्याची जरूरी आहे. शक्य तितक्या उत्कृष्ट रीतीनें आणि अंगभूत महत्त्वानुसारच पंचवार्षिक योजनेंतील अधिक गोष्टींची आंखणी करण्यांत यावी.

सर्वसामान्य कारभाराच्या व राष्ट्रीय शेतकी विस्ताराच्या सर्व बाबी पार पाडण्यासाठीं ग्रामपंचायतींकडे अधिक जबाबदारी टाकण्यासाठीं अधिक जोमानें व सतत प्रयत्न केल्यास लोकशाही रुजण्यास व सामुहिक विकास साधण्यास सुलभ पडेल. ग्रामसेवकांच्या शिक्षणासंबंधांत उल्लेखनीय सुधारणा झाली आहे. तथापि, गटांच्या विस्ताराचा वेग इतका अधिक असतांना त्यांतील अनेक ग्रामसेवक शिक्षण घेतलेले नाहींत, तर कांहींचें पुरेसें शिक्षण झालेलें नाहीं. शेतकीविषयक कार्यक्रमाचा आशय त्यांपैकीं अनेकांच्या अचूकपणें लक्षांत येत नाहीं. अशा उमेदवारांच्या निवडीबद्दलहि हेंच म्हणतां येईल. या कार्यांतील सर्व पातळीवरील विकास अधिकाऱ्यांना या उणीवांची जाणीव असूनहि व त्या दूर करण्यासाठीं सर्व प्रकारें प्रयत्न करण्यांत येत असले तरी (ग्रामसेवक व इतर नोकरवर्ग) यांच्या शिक्षणाचा हा प्रश्न, त्यांतील विषय, यंत्रणा, तपासणी आणि मूल्यमापन यासुद्धां, एकाद्या तज्ज्ञ समितीकडे पुनर्पाहणीकडे सोपविण्याची जरूरी आहे.

निरनिराळीं कामें एकाच अधिकाऱ्याकडे एकवटण्याच्या योजनेचा आणि शेतकी, सहकारी चळवळ आणि महसूल हीं तीन निरनिराळी कामें करणाऱ्या तीन प्रकारच्या खास नोकरांऐवजीं हीं तिन्हीं कामें करणारा नोकरांचा एकच वर्ग तयार करण्याच्या योजनेची सर्वांगीण पाहणी करतां, कलेक्टरच्या किंवा सबऑफिसरच्या खालच्या पातळीवर असें कामगिऱ्यांचें एकत्रीकरण होणें अनिष्ट दिसतें.

समाज विकास योजना गटाचा वा शेतकी विस्तार गटाचा मामलेदार यांचीं कामें एकत्र न ठेवतां वेगवेगळीं ठेवावीत. या दोन जागांचीं कामें, कलेक्टराच्या हुद्याखालील पातळीवरील अधिकारपदीं एकत्र केल्यास कार्यक्रमाच्या स्वरूपावर त्याचा परिणाम होण्याचा संभव आहे.

तलाठ्यास आधींच असलेल्या अनेक कामांत शेतकी विस्ताराच्या कामाची भर पडल्यावर तें विस्तारकार्य परिणामकारक होण्याची फारशी आशा नाहीं.

योजना सल्लागार समित्यांची अकार्यक्षमता निदर्शनास आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या त्या त्या विभागाच्या कार्यकारी समितीच्या आधारेंच त्यांची उभारणी करावी. अशा समित्यांत कांहीं महत्त्वाचे सरकारी अधिकारी, आमदार, यांसारख्यांना घेण्यांत यावें. अशा समितीचें स्थानिक नियोजन व त्याची अंमलबजावणी हीं कामें ज्यांजकडे आहेत अशा स्थानिक संस्थांच्या कार्याध्यक्षांची निवड करण्यांत यावी.

कोणत्याहि विभागांत संख्यात्मक स्वरूपाची उल्लेखनीय प्रगति झालेली नसली तरी सहकारी संस्थांच्या प्रगतीची दिशा व कामांतील विविधता यांमुळें विश्वास निर्माण होतो. क्रेडिट आणि इतर अनेक कामांसाठीं स्थापन झालेली खेड्यांतील विविधोपयोगी

सोसायटी ही संस्था आतां मूळ धरीत आहे. तथापि सर्व कामासाठी ती असावी अशी अपेक्षा नाहीं. अशा सोसायटींच्या क्रेडिट व इतर कामांच्या संस्थात्मक स्वरूपांत तांतडीनें बळकटी आणली नाहीं तर शेतीविस्ताराचा कार्यक्रम समाजाच्या अगदीं खाल-पर्यंत जाऊन पोचणार नाहीं.

सरकारी दडपण जेव्हां सक्तीचें रूप घेऊं लागतें तेव्हां जनतेची लोकशाही मार्गानें प्रगति करण्याच्या प्रश्नाचा निव्वळ संख्यात्मक यश मिळण्यासाठी बळी दिल्या जाण्याचा धोका वाढत जातो.

खेडेगांवांतील हस्तव्यवसाय व छोटे धंदे यांच्या प्रश्नाचा विचार करतां त्यामध्यें उल्लेखनीय अशी कांहींहि सुधारणा झालेली नाहीं. किंबहुना समाज विकास योजना आणि राष्ट्रीय शेती विस्तार संघटना यांचा विचार करतां ग्रामोद्योगांचें हें क्षेत्र अद्यापिहि मुळींच व्यापलेलें नाहीं. अर्थात् हे कार्यक्रम आंखणाऱ्यांचा वा ते अमलांत आणणाऱ्यांचा हा दोष नव्हे. शेतकी काय किंवा आरोग्य वा शिक्षण काय, या क्षेत्रांत विकास संघटना हातीं घेऊं शकतील असा यशस्वी ठरलेला कांहीं एक कार्यक्रम सांपडूं शकतो, परंतु एक खादी सोडली तर इतर ग्रामोद्योगांच्या बाबतींत असा कसोटीस उतरलेला कार्यक्रमच हातीं घेण्यासारखा नाहीं.

पंचायतींचें किंवा सहकारी संस्थांचें संस्थात्मक स्वरूप तयार झाल्याखेरीज विकास कार्यात उत्स्फूर्तपणा किंवा सातत्य यांची अपेक्षा करतां येणार नाहीं. म्हणून या संघटनेचा कारभार सुपूर्त करण्याचें काम नियोजितपणेंच हातीं घेतलें पाहिजे.


शेतकीच्या क्षेत्रांत संशोधनासाठीं अधिक व्यवस्था करणें आणि संशोधक व शेतकरी यांच्यांतील संबंध वाढविणें जरूर आहे. लोकांना नजिक पडेल अशा ठिकाणीं सुसज्ज संशोधन केंद्र करण्याची आवश्यकता आहे.

आतांपर्यंत उपलब्ध झालेल्या गोष्टींवरून हें स्पष्ट झालें आहे कीं, ग्रामीण विभागांत बौद्धिक, सामाजिक आणि आर्थिक काया-पालट घडवून आणण्यांत समाज विकास योजना महत्त्वाची कामगिरी बजावीत आहेत. या योजनेची व्याप्ति वाढवून तिच्या कक्षेंत सर्व थरांचे व सर्व वर्गांतील लोक येण्याकरतां आणि चांगल्या स्वरूपाचें जीवन जगतां यावें याकरतां लोकांना त्यांच्याच संस्थाद्वारें कार्यप्रवण करण्यासाठीं आणखी प्रगति होण्याची आवश्यकता आहे. या क्षेत्रांत काम करणाऱ्यांना याची जाणीव इतर कोणाहीपेक्षा अधिक प्रमाणांत आहे.




किर्लोस्कर

हात पंप | सेंट्रिफ्युगल पंप



उन्हाळी पिकासाठी व
घरगुती पाणीपुरवठ्यासाठी
खात्रीची उपाययोजना

—अधिक माहिती मागवा—

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी.

कण आणि क्षण

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

पृ. सं. १६८ ] दुसरी आवृत्ति [ किं. २॥ रु.

र. पु. परांजपे, ना. सी. फडके, शं. वा. किर्लोस्कर, चिं. वि. जोशी, वि. द. घाटे, इरावती कर्वे, इंदिराबाई देवधर, केसरी, सकाळ, लोकसत्ता, महाराष्ट्र, किर्लोस्कर, इत्यादींचे उत्कृष्ट अभिप्राय.

डेक्कन व्हर्नॅक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणें, कडून पुरस्कार.

सर्वत्र मिळतें. स्वतः वाचा, संग्रहीं ठेवा, आणि भेटीदाखल द्या.

पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि. १९५ भवानी पेठ, पुणें २.

खालील मालाचा घाऊक व किरकोळीनें व्यवहार केला जातो.

* शेतीचीं अवजारें, एंजिन्स व त्यांना लागणारीं तेलें.
* शेतीकरतां व जनावरांकरतां लागणारी पेंड, मिश्रखतें, अ. सल्फेट, पूर्णिमा मिश्रखत, वगैरे सर्व प्रकारचीं खतें.
* सिमला येथील शुद्ध बटाटा बियाणें व त्याकरतां लागणारें मिश्रखत.
* बटाटा, कांदा, लसूण, वगैरे शेतमालाचा अल्प कमिशनवर खरेदी–विक्री व्यवहार.
* गूळ, ज्वारी, बाजरी, तूर, वगैरे शेतमालाची खरेदी–विक्री.
* वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक सहकारी शालोपयोगी वह्या व उत्तरपत्रिका यांचा माफक दरानें पुरवठा.

फोन नं. ३२१५
तार–SANCOSOP

वरीलकरतां समक्ष भेटा अगर लिहा.

ना. द. कुलकर्णी
मॅनेजर

### उत्तम प्रतीच्या तंबाखूची लागवड

आंध्र राज्यांतील गुंतूर जिल्ह्यांत 'व्हर्जिनिआ' जातीची उत्कृष्ट तंबाखू पिकते. ह्या जातीच्या तंबाखूला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंत नेहमींच चांगली मागणी असते. ह्या जातीच्या तंबाखूची लागवड अधिक विस्तृत क्षेत्रांत करण्यासाठी भारतीय सरकारच्या शेतकी खात्यानें एक योजना तयार केली असून तिची अंमलबजावणी राज्य–सरकारच्या शेतकी खात्यातर्फे केली जाणार आहे. योजनेचा काल दोन वर्षांचा ठरविण्यांत आला आहे आणि तींवर १,५०,००० रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. तंबाखूची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना ह्या प्रतीच्या तंबाखूचा दर्जा अधिक चांगला करण्यासाठी शास्त्रीय पद्धतीनें शिक्षण देणें असा ह्या योजनेचा हेतु आहे. तंबाखू पिकविणारा शेतकरी आणि योजनेंत काम करणारा तज्ज्ञ नोकरवर्ग ह्यांचा निकटचा संबंध यावा अशी व्यवस्था करण्यांत आली आहे. गुंतुर जिल्ह्यांत 'व्हर्जिनिआ' जातीची तंबाखू पिकविणारें क्षेत्र सुमारें ७५,००० एकर इतकें आहे. ह्या सर्व क्षेत्राचे १५ विभाग करण्यांत आले असून प्रत्येक विभाग एकेका अधिकाऱ्याच्या देखरेखीखालीं राहील. १९५३–५४ सालीं भारतांत तंबाखूच्या लागवडीचें एकूण क्षेत्र सुमारें ८,९०,००० एकर होतें. तंबाखूचें एकूण उत्पादन ५७·१ कोटी पौंड झालें. त्यांपैकी 'व्हर्जिनिआ' जातीच्या तंबाखूचें उत्पादन ८·७३ कोटी पौंड झालें. तंबाखूच्या निर्यातीनें त्या सालीं भारताला १२ कोटी रुपयांची परदेशी हुंडणावळ मिळाली.

### भारताजवळील व्यापारी बोटी

जगांतील राष्ट्रांच्या जवळ असलेल्या व्यापारी बोटींची आंकडेवार माहिती संयुक्त राष्ट्र संघटनेतर्फे प्रकाशित करण्यांत आली आहे. प्रकाशनांत इतर राष्ट्रांबरोबर भारताजवळील व्यापारी वहातूक करण्याच्या बोटींचीहि माहिती देण्यांत आली आहे. एका वर्षापूर्वी सर्व जगांतील व्यापारी बोटींचें वजन ९,३३,५२,००० रजिस्टर्ड टन होतें. ह्या वजनांत भारतीय व्यापारी बोटींचें वजन अवघें ४,८८,००० रजिस्टर्ड टन होतें. म्हणजे एकूण व्यापारी बोटींच्या वजनाच्या तुलनेनें भारतीय व्यापारी बोटींचें वजन ½ टक्के होतें. तथापि, स्वातंत्र्य-प्राप्ती-नंतरच्या कालांत भारताजवळील व्यापारी बोटींच्या काफिल्यांत २५ टक्के भर पडलेली दिसून येते. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या प्रकाशनांत दिलेल्या माहितीप्रमाणें आजच्या जगांत अमेरिका आणि ब्रिटन हीं दोनच राष्ट्रें अव्वल दर्जाचीं दर्यावर्दी राष्ट्रें म्हणून सांगतां येतील. अमेरिकेजवळ असलेल्या व्यापारी बोटींचें वजन २·७ कोटी टन इतकें भरेल; तर ब्रिटनजवळील व्यापारी बोटींचें वजन १·८ कोटी टन भरेल. आशिआंतील राष्ट्रांत व्यापारी बोटींच्या बाबतींत जपानची अनुक्रम पहिला लागतो. जपानजवळ ३२,५०,००० टन वजनाच्या बोटी आहेत. जपान-नंतर चीनचा व नंतर भारताचा अनुक्रम लागतो. गेल्या सात वर्षांत जपाननें आपल्या जवळील व्यापारी बोटींमध्यें ३०० टक्के वाढ केलेली आहे. तथापि, दुसरें महायुद्ध सुरू होण्याच्या सुमारास जपानजवळ ५५९ लाख टन वजनाच्या व्यापारी वहातुकीच्या बोटी होत्या.

### स्टेट बँक १ जुलै रोजीं सुरू होणार

इंपीरिअल बँकेचें आयुष्य ३० जून अखेर संपून १ जुलै पासून तिचें स्टेट बँक ऑफ इंडियांत रूपांतर होईल, असें समजतें.

### बॉंबे स्टेट रोड ट्रॅन्स्पोर्ट कॉर्पोरेशन

वरील कॉर्पोरेशनचा व्याप खालीलप्रमाणें आहे. १,७७८ मार्गांवरून एस्. टी. च्या गाड्यांची वहातूक चालू आहे. ४६,३७८ मैल लांबीच्या रस्त्यांवरून त्या जातात. दररोज ४,७०,३७० उतारू ह्या गाड्यांतून प्रवास करतात. कॉर्पोरेशनला दररोज भाड्याचे २,८९,३७९ रु. मिळतात. कॉर्पोरेशनमध्यें गुंतलेल्या ८·५ कोटी रु. भांडवलावर १९५३–५४ मध्यें १४६ लक्ष रु॰ ठोक नफा झाला.

### स्टेट बँकेचे चेअरमन, डॉ. मथाई

पूर्वीचे अर्थमंत्री, डॉ. जॉन मथाई, ह्यांनीं स्टेट बँक ऑफ इंडियाचे चेअरमन होण्यास मान्यता दिली आहे.

### श्री. सरय्या जपानला रवाना

मुंबई राज्य सहकारी बँकेचे चेअरमन, श्री. आर. जी. सरय्या, हे इंटर नॅशनल चेंबर ऑफ कॉमर्सच्या १५ व्या अधिवेशनास उपस्थित होण्यासाठी टोकियोला जाणार आहेत. १५ मे ते २१ मे हें अधिवेशन चालेल व त्यांत ४० देशांतील संस्थांचे १,००० प्रतिनिधी भाग घेतील.

### रहाता भाग सहकारी साखर कारखाना

वरील सहकारी साखर कारखान्याची पहिली साधारण सभा दि. ३० एप्रिल रोजीं झाली. प्रा. गाडगीळ हे अध्यक्षस्थानीं होते. सोसायटीनें ५ लक्ष रु. भाग भांडवल गोळा केलें आहे.

### नॅशनल प्लॅन सर्टिफिकिटांत अधिक रक्कम गुंतवितां येईल

नॅशनल प्लॅन सर्टिफिकिटांत सध्या एका व्यक्तीस १,००० रु. गुंतवितां येतात, आणि जोड–नांवानें २,००० रु. गुंतवितां येतात. ही कमाल मर्यादा अनुक्रमें २,५०० रु. व ५,००० रु. करण्यांत आली आहे. १० मे पासून ही कमाल मर्यादा वाढविण्यांत आली आहे. ह्या सर्टिफिकिटांत १०० रुपये गुंतविले, तर १० वर्षांनीं त्याचे १४५ रु. होतात; म्हणजे त्यावर ४½% व्याज सुटतें. व्याज करमाफ असतें.

**विकास–योजना पहाण्यास उत्तेजन**—अहमदाबाद जिल्ह्यांतील दसक्रोइ तालुका डेव्हलपमेंट बोर्डानें देशांतील विकास योजना पाहून येण्यासाठी शेतकऱ्यांच्या एका तुकडीला आपल्या खर्चानें प्रवासास पाठविण्याचें ठरविलें आहे. त्यांच्या प्रवास खर्चासाठी ५,००० रुपयांची रक्कम मंजूर करण्यांत आली आहे. अशा सहलींना उत्तेजन देण्याचें भारतीय सरकारचें धोरण आहे.

**नर्मदा–तापी नद्यांना येणारे पूर**—अखिल भारतीय–पूर-नियंत्रण मंडळानें भुसावळ येथें आपलें संशोधन–केंद्र उघडलें आहे. नर्मदा व तापी ह्या नद्यांना येणाऱ्या पुरावर नियंत्रण ठेवण्यासाठी जी योजना आंखण्यांत येत आहे, तीसंबंधी माहिती गोळा करण्याचें काम हें केंद्र करील. ह्यापूर्वीच भोपाळ, खांडवा व बऱ्हाणपूर ह्या ठिकाणीं प्राथमिक कार्याला आरंभ करण्यांत आला आहे.

**भोपाळमध्यें केंद्रीय सहकारी बँक**—भोपाळमधील केंद्रीय सहकारी बँकेचें उद्घाटन नुकतेंच करण्यांत आलें. बँकेचें भांडवल २५ लाख रुपयांचें असून तिला रिझर्व्ह बँकेचा आर्थिक पाठिंबा राहील. एकूण भांडवलापैकीं बराच मोठा भाग राज्य–सरकारनें खरेदी केला आहे.

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरी:–भोर, जि. पुणें.**

शाखा:–पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७६,००० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब व. द. खोले. श्री. चं. रा. राठी.

श्री. गो. वा. देवी श्री. बा. ग. चंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

• अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. एन्. व्ही. पांडव, मॅनेजर



स्थापना सन १९३५ टे. न. २४५१८

## दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १

( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | |
|---|---|
| संकल्पित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ८०,०००हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. खं. सा. दौंडकर, एम्. ए., एलएल. बी., (अध्यक्ष)

श्री. रा. सा. भ. ना. ढोबळे, ( उपाध्यक्ष )

श्री. द. अ. ढोबळे, बी. ए., एम्. एल. ए., जे. पी., ( मॅनेजिंग डायरेक्टर )

श्री. उ. भा. तांबे, श्री. आ. पां. ढोरे,

श्री. म. मा. वामन, श्री. गे. गो. ढोले,

श्री. खं. स. काळे, श्री. गे. ल. नलवडे.

डायरेक्टर्स.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.



## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८१

भोर, पौड व वडगांव ( मावळ ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेर्‍या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतहि सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठी कर्जे देणें, सोनें–चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.

अेक ते दहा वर्षे मुदतीच्या ठेवीहि स्वीकारल्या जातात.

१ वर्ष २ टक्के, २ वर्षे २॥ टक्के, ५ वर्षे ३ टक्के, ७ वर्षे ३॥ टक्के, १० वर्षे ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

दराबद्दल समक्ष चौकशी करावी.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याशेरीज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस् व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा ठेवीदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. खडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.



## दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी:—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

— शाखा —

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

♣

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. १,४०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | रु. ५०,००,००० |

—यच्चयावत् बँकिंग–व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. चौधरी, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली चेअरमन

श्री. महादेव बाळाप्पा चौगुले कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा,
बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.